# करुणा व उदारता

## आनंदमय जन्मदिवसाप्रीत्यर्थ प्रस्तुत
## श्रीगुरुमाईंसमवेत घडलेले काही प्रसंग

### श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : १

*वाणी अग्रवाल*

भारतात असलेल्या गुरुदेव सिद्धपीठ आश्रमात सहा वर्षे एक गुरुकुल विद्यार्थिनी म्हणून सेवा अर्पण केल्यानंतर, वर्ष १९९१ मध्ये एस. वाय. डी. ए. फाउंडेशनच्या स्टाफच्या रूपात सेवा अर्पण करण्यासाठी मी श्री मुक्तानंद आश्रमात आले.

श्री मुक्तानंद आश्रमात येण्यापूर्वीच माझ्या वैयक्तिक जीवनात एक महत्त्वाची घटना घडली होती आणि माझी खूप इच्छा होती की, मी गुरुमाईंना त्याविषयी सांगावे. त्या दरम्यान जेव्हाजेव्हा मी गुरुमाईंबरोबर असायचे तेव्हा अनेकदा मी त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला; पण का कोणास ठाऊक, मी त्यांना सांगू शकले नाही.

तिथे पोहोचल्यानंतर दोन महिन्यांनी, अखेर मी गुरुमाईंना सांगू शकले की, माझ्या जीवनात काय घडले होते.

गुरुमाईंनी विचारले, “हे तू मला आधी का नाही सांगितलेस?”

मी उत्तर दिले, “गुरुमाई, माझे मलाच समजत नाही की, इतके दिवस मी ही गोष्ट माझ्या मनात का ठेवली.”

तेव्हा गुरुमाई असे काहीतरी म्हणाल्या जे अतिशय सुंदर होते. त्या म्हणाल्या, “जब तुम्हें ऐसा लगे और तुम आगे आकर अपनी बात न बता पाओ तो पत्र लिखकर पूजा में रखो और प्रार्थना करो।” म्हणजे, “जेव्हा तुला असे वाटेल आणि तू स्वतःहून मला सांगू शकत नसशील, तेव्हा पत्र लिहून ते पूजेत ठेव आणि प्रार्थना कर.”

काही महिन्यांनंतर अशी एक परिस्थिती निर्माण झाली जेव्हा मी अगदी गुरुमाईंनी सांगितल्याप्रमाणेच करायचे ठरवले. मला गुरुमाईंना तीन प्रश्न विचारण्याची इच्छा होती; पण ते विचारावेत, की नाही हेच मला कळत नव्हते. म्हणून, मी त्यांना पत्र लिहिले. पत्रात मी अगदी स्पष्टपणे आणि थोडक्यात माझे तिन्ही प्रश्न लिहिले. त्यानंतर मी ते पत्र पूजास्थानी ठेवले आणि मार्गदर्शनासाठी प्रार्थना केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी अनुग्रह बिल्डिंगमध्ये असलेल्या अमृतकडे चालले होते. मी पाहिले की, गुरुमाई समोरून माझ्याच दिशेने येत होत्या. त्यांनी जेव्हा मला पाहिले तेव्हा त्या माझ्यासमोरच येऊन थांबल्या. त्यांच्या डोळ्यांमध्ये एक चमक होती. त्या म्हणाल्या, “तुला काही प्रश्न आहेत तर!” मग त्यांनी माझ्या तिन्ही प्रश्नांची उत्तरे दिली—आणि त्यांनी ती उत्तरे त्याच क्रमाने दिली ज्या क्रमाने पत्रात मी माझे प्रश्न लिहिले होते.

मी आश्चर्यचकित होऊन गेले. गुरुमाईंनी माझ्या हृदयाची प्रार्थना ऐकली होती! या अनुभवाने माझा हा विश्वास आणखी दृढ झाला की, मी कुठेही असले तरी माझ्या श्रीगुरू माझ्यासोबत आहेत. जेव्हाही मी त्यांना प्रार्थना करते तेव्हा माझ्या श्रीगुरू ती ऐकतात.

© २०१७ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.